| | | |
|---|---|---|
| | पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी - चिंचवड<br>कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,<br>पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३. | |
| जा.क्र पोउआ/वाहतूक/उपक्रम/ ई- 8/2/07 /२०२४ | पिंपरी-चिंचवड | दिनांक १४/०३/२०२४ |

## प्रेसनोट

## वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त, कार्यालय पिंपरी चिंचवड कार्यक्षेत्रामध्ये वाहतूक शाखेचे सर्व प्रभारी अधिकारी आपआपले विभागामध्ये दर गुरूवारी "एक दिवस शाळेसाठी" हा उपक्रम राबवत आहेत. या उपक्रमांतर्गत वाहतूक शाखेच्या एकुण २० टिम दर गुरूवारी २० शाळांमध्ये जावुन विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमन, अपघात विषयी माहिती, व्यसनाधिनतेपासुन दुर राहणे, सायबर गुन्हेगारी, सोशल मिडियाचा वापर, स्त्रीया व मुली यांचा सन्मान करणे. इत्यादी मुद्यांवर मार्गदर्शन करीत आहेत.

आज दि.१४/०३/२०२४ रोजी वाहतूक शाखेमार्फत पंधराव्या टप्प्यात एकुण १५ टिमच्या माध्यमातुन, निवडलेल्या १५ शाळांमधुन सुमारे ३९३० विद्यार्थ्यांपर्यंत पोहचुन त्यांना पीपीटीद्वारे मुद्देसूद मार्गदर्शन करण्यात आले. "एक दिवस शाळेसाठी" या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत एकुण पंधरा टप्प्यांमध्ये ६५३७६ विद्यार्थांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक व चांगला माणुस बनावे या दृष्टीकोनातून पिंपरी चिंचवड वाहतूक विभागामार्फत या प्रबोधनपर उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

वरील उपक्रम मा. श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. विशाल गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली , श्री. भास्कर डेरे सहायक पोलीस आयुक्त-१ वाहतूक शाखा, श्री. सतीश कसबे सहायक पोलीस आयुक्त-२ वाहतूक शाखा व वाहतूक शाखेचे सर्व पोलीस अधिकारी व अधिनस्थ अंमलदार यांचे मार्फतीने आज दि. १४/३/२०२४ रोजी यशस्वीरित्या पार पडला. उस्फूर्त प्रतिसाद मिळणा-या या विद्यार्थीभिमुख उपक्रमाचा पुढील टप्पा २१ मार्च २०२४ रोजी पार पडणार आहे.

( सतीश कसबे )
सहायक पोलीस आयुक्त
वाहतूक शाखा , पिंपरी चिंचवड

प्रतः १) जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड.
२) सर्व संपादक/ वार्ताहर, सर्व लोकप्रिय वृत्तपत्रे.

Scanned with OKEN Scanner